# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** संगमनेर शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0593 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/06/2025 05:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 27/06/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/06/2025
**Time From (वेळेपासून):** 14:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 28/06/2025 **Time (वेळ):** 03:48 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 012
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/06/2025 03:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सह्याद्री बहुजन विद्याप्रसारक,समाजसंस्था कार्यालय संगमनेर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अमोल जगन्नाथ दुसाने
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु पो घुलेवाडी, तासंगमनेर ,संगमनेर शहर ,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु पो घुलेवाडी, तासंगमनेर ,संगमनेर शहर ,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9850763218

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाबुराव राजाराम गवांदे | | | 1. रा चैतन्य, नवप्रेरणा हौसो, ,रोड, संगमनेर तासंगमनेर जिल्हा, संगमनेर शहर ,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | चंद्रभान काशिनाथ मुटकुळे | | | 1. रा चिकनी ता संगमनेर ,संगमनेर शहर ,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



CS CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2 लाख रूपये | 200,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

200,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

संगमनेर शहर पोलीस ठाणे

जि.अहिल्यानगर

दिनांक 28.06.2025

फिर्याद

मी अमोल जगन्नाथ दुसाने, वय 32 वर्ष व्यवसाय नोकरी- शिक्षक, भाऊसाहेब गुंजाळ पाटील सहयाद्री ज्युनिअर का ॅलेज, संगमनेर ता.संगमनेर जिल्हा अहिल्यानगर रा. मु.पो.घुलेवाडी ता.संगमनेर जिल्हा अहिल्यानगर मो.नं. 9850763218

मी वरील ठिकाणी आई, वडील, पत्नी वर्ष, मुलगा अव्दैत असे एकत्रकुटूंबी राहतो. मी शासनाच्या पवित्र पोर्टल शिक्षक नेमणुक प्रक्रीयेत सन 2022 मध्ये झालेल्या परीक्षेमध्ये चांगले गुण मिळवुन पास झालो होतो. प्रथम फेरीत माझी नियुक्ती पुणे महानगरपालिका शाळेत शिक्षक (शिक्षण सेवक) म्हणुन झाली होती त्यानंतर दुस-या फेरीत माझी नियुक्ती सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर या संस्थेत 20 टक्के अनुदानीत सहाय्यक शिक्षक म्हणुन भाऊसाहेब गुंजाळ पाटील सहयाद्री ज्युनिअर का ॅलेज, संगमनेर येथे निवड झाली होती. त्यानंतर मी संस्थेचे मुलाखतीमध्ये उत्तम गुण मिळविल्याने त्यांनी माझी सदर पदासाठी नियुक्ती केली व तसे नियुक्तीपत्र मला दिले होते. त्यावेळी मी माझे पुर्वीचे पदाचा रितसर राजीनामा देवुन मी मुलाखतीच्या निवडीतुन दिनांक 20.09.2024 रोजी शिक्षक म्हणुन भाऊसाहेब गुंजाळ पाटील सहयाद्री ज्युनिअर का ॅलेज, संगमनेर येथे रूजु झालो.

दिनांक 24.06.2025 रोजी मी भाऊसाहेब गुंजाळ पाटील सहयाद्री ज्युनिअर का ॅलेज, संगमनेर येथे मी शालेय कामकाजामध्ये व्यस्त होतो. त्या दरम्यान दुपारी माझे मोबाईलवर मला सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर या संस्थेचे लेखनिक श्री मुटकुळे यांचे दोन मिसका ॅल आलेले दिसले. म्हणुन मी त्यांना फोन करून सर तुम्ही का ॅल केला होता का असे विचारले असता त्यांनी तुम्हाला संस्थेचे सह सेक्रेटरी गवांदे सर यांनी संस्थेचे कार्यालयात भेटावयास बोलावले आहे असा निरोप दिला.

त्यानुसार मी काही वेळाने दुपारी अंदाजे 02.30 वाजेचे सुमारास संस्था कार्यालयात जावुन संस्थेचे सह सेक्रेटरी गवांदे सर यांना भेटलो असता तेथे संस्थेचे लेखनिक मुटकुळे हे देखील उपस्थित होते. तेव्हा सह सेक्रेटरी श्री गवांदे सर म्हणाले की, तुम्ही 20 टक्के अनुदानीत पदावर सह शिक्षक म्हणुन काम करीत आहात. भविष्यात पुढील टप्पा अनुदान 40 टक्के, 60 टक्के याप्रमाणे 100 टक्के पर्यंत शासनाचे अनुदान वाढणार आहे व त्याप्रमाणे तुम्हाला भरपुर पगार मिळणार आहे, हे सगळे माझे हातात आहे. माझे शिवाय तुमचे कोणतेही काम होणार नाही. महाराष्ट्र शासनाने जरी तुम्हाला पवित्र पोर्टल मार्फत या संस्थेत पाठविले असले तरी देखील तुमचे सगळे भविष्य माझे हातात आहे. कारण तुम्ही शासनाकडुन नियुक्त झालेले असल्यामुळे संस्थेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे संस्थेचे आर्थिक नुकसान भरून काढावयाचे असल्याने वेळ वाया न घालवता तुम्ही संस्थेला 3 लाख रूपये आणुन जमा करा. आम्ही इतर शासनाकडुन आलेल्या लोकांकडुनही 5 ते 10 लाखापर्यंत पैसे जमा केलेले आहे. फक्त तुच असा एकटा आहे की, ज्याने आजपर्यंत एकही रूपया दिलेला नाही. त्यामुळे तुला भविष्यात सर्व काही सुरळीत चालु द्यायचे असेल व वेळेवर अनुदान घ्यायचे असेल येत्या तर 2-3 दिवसात 3 लाख रूपये माझेकडे आणुन दे व



CS CamScanner

याबाबत कोणालाही सांगु नको. त्यावर मी त्यांना माझी नियुक्ती परीक्षा देवुन शासनातर्फे झालेली आहे, त्यामुळे मी कशासाठी पैसे देवु, त्यावर त्यांनी सर्व संस्थांमध्ये असेच चालते व सर्व संस्थाचालक असे पैसे घेतात. तुझे भविष्यात होणा-या सर्व आर्थिक बाबी संस्थेच्या हातात आहेत. तुझे करीयरची हि सुरुवात आहे, जर तु पैसे आणुन दिले नाही तर, तुझे करीयर बरबाद करू शकतो एवढे माझेकडे अधिकार आहेत. त्यावर मी त्यांना जर मी पैसे दिले तर त्याबाबत मला काही पावती मिळेल किंवा आॅनलाईन पैसे दिले तर चालतील का? असे विचारले असता त्यांनी तुला रोख स्वरूपात पैसे आणुन द्यावे लागतील असे सांगितले. त्यावर माझी खात्री झाली की, संस्थेचे सह सेक्रेटरी श्री गवांदे हे माझी नियुक्ती शासनातर्फे सह शिक्षक म्हणुन झालेली असतांना देखील माझे भविष्यातील पगारवाढी साठी संस्थेतर्फे आडकाठी निर्माण न करण्यासाठी माझेकडे 3 लाख रूपये लाचेची मागणी करीत आहेत.

मी पुन्हा संस्थेचे सहसेक्रेटरी श्री गवांदे सर यांची भेट घेण्यासाठी सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संस्था कार्यालय, संगमनेर येथे जाणार असल्याने भेटीदरम्यान संस्थेचे सह सेक्रेटरी श्री गवांदे सर हे माझेकडे माझे भविष्यातील पगारवाढी साठी संस्थेतर्फे आडकाठी निर्माण न करण्यासाठी लाचेची मागणी करणार याची मला पुर्ण खात्री आहे. मला त्यांना लाच देण्याची अजिबात इच्छा नाही. किंवा त्यांचेत व माझेत कुठलाही आर्थिक अथवा उसनवारीचा व्यवहार नाही ंिकंवा त्यांचेत व माझेत कुठलेही वैमनस्य नाही. संस्थेचे सह सेक्रेटरी श्री गवांदे सर यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशिर कारवाई करणे संदर्भात मी नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिनांक 27.06.2025 रोजी तक्रार दिली.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर या संस्थेचे सह सेक्रेटरी श्री गवांदे सर हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणे कामी दिनांक 27.06.2025 रोजी मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथुन आलेले श्री एकनाथ पाटील साहेब यांनी पडताळणी कारवाईकामी आवश्यक सुचना देवुन माझेकडे व्हाईस रेकाॅर्डर चालु करून देवुन सह सेक्रेटरी श्री गवांदे सर यांचे भेटीसाठी रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच श्री विकास उबाळे अशानी संस्थेचे सह सेक्रेटरी श्री गवांदे सर यांची भेट घेतली असता, त्यांचेसोबत मी दिनांक 24.06.2025 रोजी त्यांचेशी झालेले चर्चेचे अनुशंगाने चर्चा केली. त्यावेळी त्यांनी माझेकडे 3 लाख रूपयाची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना रक्कम एकरकमी दिली तर काही सवलत मिळेल का असे विचारले असता त्यांनी तुम्ही एकरकमी रक्कम दिल्यास 1 लाख रूपयाची सवलत मिळेल, तुम्हाला फक्त 2 लाख रूपये द्यावे लागतील असे म्हणुन लाच स्विकृतीस संमती देवुन लाच स्विकारण्याचे मान्य केले. सदर बाबत सविस्तर पडताळणी पंचनामा पंचासमक्ष करण्यात आला आहे.

संस्थेचे सह सेक्रेटरी श्री गवांदे सर यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम लागलीच घेऊन दुपारी 04.00 वाजेपर्यंत घेवुन येण्याबद्दल मला सांगितले होते. त्याप्रमाणे दिनांक 27.06.2025 रोजी पंचासमक्ष सापळा पथक प्रमुख श्री एकनाथ पाटील साहेब यांनी लाचेच्या 50,000/- रुपये ज्यात मी दिलेल्या 500 रूपये दराच्या 16 चलनी नोटा व टाॅय करन्सी (खेळण्यातील नोटा) मधील 500 रूपयाच्या 84 नोटा अशा रकमेस अॅन्थ्रासीन पावडर लावुन, त्याच्या गुणधर्माची माहिती देऊन व त्याचे प्रात्यक्षिक दाखवुन मला व पंच श्री विकास उबाळे यांना आवशयक त्या सुचना देऊन माझेकडे व्हाईस रेकाॅर्डर चालु करून देवुन संस्थेचे सह सेक्रेटरी श्री गवांदे सर यांना भेटण्यासाठी पाठविले. त्याप्रमाणे मी व पंच श्री विकास उबाळे असे संस्थेचे कार्यालय असलेले इमारतीत गेलो असता तेथे आमची व संस्थेचे सह सेक्रेटरी श्री गवांदे सर यांची भेट झाली. त्यावेळी मी त्यांना 50000/- रूपये आणले आहेत बाकीचे पैसे नंतर देतो असे सांगितले. तसेच माझी नियुक्ती शासनातर्फे झालेली असतांना पैसे का घेतात असे विचारले असता त्यांनी संस्थेत प्रत्येक जण घेतो असे म्हणाले त्यानंतर मी 50000/- रूपये लाचेची रक्कम देण्यासाठी पॅन्टचे खिशातुन काढुन त्यांचे समोर धरले असता त्यांनी प्रथम नोटांना हात लावला व लागलीच लेखनिक मुटकुळे यांना आवाज दिला त्यावेळी नोटांचे बंडल माझे हातातच होते. लेखनिक मुटकुळे हे आल्यानंतर त्यांनी मुटकुळे यांना पैसे घेवुन मोजण्यास सांगितले. लेखनिक मुटकुळे यांनी लाचेची रक्कम माझेकडुन स्विकारली. म्हणुन त्या दोघांना सापळा पथकाने ताब्यात घेतले. तसा सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी दिनांक 27.06.2025 रोजी सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक या संस्थेचे सह सेक्रेटरी श्री गवांदे यांनी माझी नियुक्ती शासनातर्फे सह शिक्षक म्हणुन झालेली असतांना देखील माझे भविष्यातील पगारवाढी साठी संस्थेतर्फे आडकाठी निर्माण न करण्यासाठी माझेकडे 3 लाख रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 2 लाख रूपयाची मागणी करून सदर लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली तसेच सदरचे लाच रकमेपैकी 50,000/- रूपये लाच रक्कम (ज्यात ज्यात मी दिलेल्या 500 रूपये दराच्या 16 चलनी नोटा व टाॅय करन्सी (खेळण्यातील नोटा) मधील 500 रूपयाच्या 84 नोटा) प्रथम त्यांनी स्वता व त्यानंतर संस्थेचे लेखनीक मुटकुळे यांनी सदरची रक्कम हि लाचेची असल्याचे माहित असुन देखील माझेकडुन सायंकाळी 05.10 वाजेंचे सुमारास स्विकारली. म्हणुन माझी 01) बाबुराव राजाराम गवांदे, वय 75 वर्श, सेवानिवृत्त शिक्षक, सध्या सह सेके्रटरी सहयाद्री बहुजन विद्या



CamScanner

प्रसारक समाज संस्था, संगमनेर ता.संगमनेर जिल्हा अहिल्यानगर रा.चैतन्य, नवप्रेरणा हौ.सो., मालदाड रोड, संगमनेर ता.संगमनेर जिल्हा अहिल्यानगर 02) चंद्रभान काशिनाथ गुटकुळे, वय 62 वर्श, लेखनिक, सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संस्था कार्यालय, संगमनेर ता.संगमनेर जिल्हा अहिल्यानगर रा.चिकनी ता.संगमनेर जिल्हा अहिल्यानगर यांचेविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदयाप्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ravindra Narsinh Deshmukh(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



CS CamScanner

14 **Signature/Thumb Impression of the complainant / Informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
भिंगार शहर पोलीस स्टेशन
जि. अहमदनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Ravindra Narsinh De
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**



CS CamScanner